# नगरपरिषद प्रशासन संचालनालय

बेलापूर भवन, ७ वा मजला, बेलापूर सी.बी.डी. रेल्वे स्टेशनजवळ
बेलापूर (पूर्व), नवी मुंबई-४०० ६१४

## महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा- २०२३

जाहिरात क्र. नपप्रसं/कक्ष-३ ब/संवर्ग पदभरती/प्र.क्र./०१/२०२३/३८३४ — दि. ११ जुलै, २०२३

## पदभरतीसाठी जाहिरात

राज्य शासनाच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालय अधिनस्त ''महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा'' मधील खालील संवर्गातील गट-क (श्रेणी अ, ब आणि क) मधील रिक्त असेलेली पदे नामनिर्देशनाने/ सरळसेवेने भरण्याकरिता आयोजित परीक्षेसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तसेच त्यासाठी सविस्तर जाहिरात https://mahadma.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सेवा व संवर्ग निहाय भरती करावयाच्या पदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सेवा व पदाचे नाव | श्रेणी निहाय भरती करावयाच्या पद संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | श्रेणी-क | | |
| | | श्रेणी-अ | श्रेणी-ब | सर्वसाधारण उमेदवार | न.प./न.पं कर्मचारीसाठी राखीव २५% | एकूण |
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, स्थापत्य अभियंता, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | २५ | १३४ | १७४ | ५८ | ३९१ |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद विद्युत अभियांत्रिकी सेवा, विद्युत अभियंता, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | ०५ | ०७ | २७ | ०९ | ४८ |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद संगणक अभियांत्रिकी सेवा, संगणक अभियंता, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | ०२ | ०२ | ३१ | १० | ४५ |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, जलनिःसारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | ०४ | ०६ | ४१ | १४ | ६५ |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरीक्षण व लेखा सेवा, लेखापाल/लेखापरीक्षक गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | ०५ | १५ | १७० | ५७ | २४७ |
| ६ | महाराष्ट्र नगरपरिषद करनिर्धारण व प्रशासकीय सेवा, कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | २४ | ९३ | ३४६ | ११६ | ५७९ |
| ७ | महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा, अग्निशमन अधिकारी, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | ०८ | ४५ | २३९ | ८० | ३७२ |
| ८ | महाराष्ट्र नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक सेवा, स्वच्छता निरीक्षक, गट-क (श्रेणी अ, ब आणि क) | ०४ | ३१ | ०० | ०० | ३५ |
| | एकूण | ७७ | ३३३ | १०२८ | ३४४ | १७८२ |

**टीप :** महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार नगरपरिषद/ नगरपंचायत कर्मचाऱ्यांमधून भरावयाच्या २५% पदसंख्येएवढे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, रिक्त राहिलेली पदे भरतीतील इतर खुल्या पात्र उमेदवारातून भरण्यात येतील.

प्रत्येक संवर्गनिहाय भरती करावयाच्या पदांचा वेतनश्रेणीसह सविस्तर तपशील, संवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील व पदसंख्या, संबंधित पदासाठी आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता व इतर अर्हता तसेच नगरपरिषद/ नगरपंचायत कर्मचाऱ्यांकडून भरावयाच्या पदांचा तपशील इतर अनुषंगीक बाबी सविस्तर जाहिरातीत, उमेदवारांना सर्वसाधारण सूचना व परीक्षा योजनेत नमूद करण्यात आलेल्या आहेत.

या पदभरतीसाठी आयोजित ऑनलाइन पद्धतीने (Computer Based Test) परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात आयोजित करण्यात येत आहेत.

उपरोक्त परीक्षेसाठी सविस्तर अभ्यासक्रम तसेच ''परीक्षा योजना (अधिकची माहिती)'' संचालनालयाचे संकेतस्थळ https://mahadma.maharashtra.gov.in उपलब्ध आहे.

प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास इच्छुक व जाहिरातीत नमूद अर्हता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांनी आपले अर्ज ऑनलाइन पद्धतीने संचालनालयाच्या संकेतस्थळ https://mahadma.maharashtra.gov.in द्वारे सादर करावयाचे आहेत. अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक खालील प्रमाणेआहे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकृतीचा कालावधी | दि. १३ जुलै, २०२३ गुरुवार ते दि. २० ऑगस्ट, २०२३ रविवार रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| २ | परीक्षेसाठी परीपूर्ण अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २० ऑगस्ट, २०२३ रविवार, रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| ३ | ऑनलाइन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा दिनांक | दि. १३ जुलै, २०२३ गुरुवार ते दि. २० ऑगस्ट, २०२३ रविवार रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| ४ | परीक्षेकरिता प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |

वरील पदभरतीसाठी संवर्गनिहाय स्वतंत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने (Computer Based Test) विहित करण्यात येणाऱ्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. यासंबंधी अधिक तपशील संचालनालयाच्या यांचे https://mahadma.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर यासाठीची ''भरतीची सविस्तर जाहिरात'', ''परीक्षा योजना/ पद्धती ''व'' उमेदवारांना सर्वसाधारण सूचना'' यात उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

दिनांक : ११ जुलै, २०२३

स्वा/-
(डॉ. किरण कुलकर्णी भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

Dgipr-2023-24/2037